वनपट्टेधारकांच्या वनहक्क दाव्यांसंदर्भातील वनहक्क दावे अंतिम करण्यासंदर्भातील कार्यवाही व मंजूर वनपट्टे वाटपाची कार्यवाही दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत विशेष मोहीम स्वरूपात राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन परिपत्रक क्र.जमीन-३०२६/प्र.क्र.८९/जमीन-६.**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :-२७ ऑक्टोबर, २०२६.**

**संदर्भ :**

१. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६.
२. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) नियम, २००८ व त्यामधील सुधारणा.
३. शासन परिपत्रक क्र. जमीन-३०२६/प्र.क्र.८९/जमीन-६, दिनांक १० सप्टेंबर, २०२६.
४. मुख्यमंत्री सचिवालयाचे पत्र क्र. CMO/SO/१०२६/६७८, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६

**प्रस्तावना :**

वनपट्टेदारांच्या पात्र वैयक्तिक व सामुहिक वन हक्क दाव्यांच्या तपासणीची कार्यवाही विहित प्रक्रियेनुसार पूर्ण करून पात्र दावेदारांना वन हक्क प्रदान करण्याच्या कार्यवाहीस गती देण्याकरीता संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकान्वये राज्यात विशेष कालबद्ध वनहक्क मोहीम दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीमध्ये अभियान स्वरूपात राबविण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

श्रमजीवी संघटनेच्या विविध मागण्यांबाबत दिनांक २१ ऑक्टोबर, २०२६ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये प्राप्त झाले आहे. सदर पत्रासोबतच्या इतिवृत्तामध्ये वनपट्टेधारकांच्या वनहक्क दाव्यांसंदर्भातील वनहक्क दावे अंतिम करण्यासंदर्भातील कार्यवाही व मंजूर वनपट्टे वाटपाची कार्यवाही दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत विशेष मोहीम स्वरूपात राबविण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर निर्देशांच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांमध्ये आवश्यक ती सुधारणा करून सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रक**

संदर्भ क्र. ३ येथील दिनांक १० सप्टेंबर, २०२६ च्या परिपत्रकातील दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२६ हा अभियान कालावधी व त्यातील टप्प्यानिहाय तारखांची मुदत वाढविण्यात येत असून

आता सर्व प्रलंबित वनहक्क दावे दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत निर्णयीत करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष मोहीम राबविण्यात यावी.

**१. मोहिमेचा कालावधी व व्याप्ती**

१. ही मोहीम राज्यात दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत राबविण्यात यावी.

२. मोहिमेत ग्रामस्तरीय वन हक्क समिती, उपविभागस्तरीय वन हक्क समिती व जिल्हास्तरीय वन हक्क समिती यांच्याकडील सर्व प्रलंबित वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे समाविष्ट करावेत.

३. या मोहिमेत एकही दावा प्रलंबित राहणार नाही, याची संबंधित सर्व समित्या व अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

**२. ग्रामस्तरीय वन हक्क समितीची कार्यवाही**

१. प्राप्त वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दाव्यांचे अर्ज, उपलब्ध पुरावे, संबंधित अभिलेख, दाव्यातील क्षेत्र, सीमांकन व इतर आवश्यक बाबींची तपासणी करावी.

२. आवश्यकतेनुसार महसूल व वन विभागाच्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने दाव्यांची स्थळपडताळणी व अभिलेखीय पडताळणी पूर्ण करावी.

३. प्रत्येक दाव्याबाबत कायद्यातील तरतुदींनुसार विचार करून मंजूर / नामंजूर / आंशिक मंजुरीबाबतचा निर्णय विहित पद्धतीने नोंदवावा.

४. सर्व वैयक्तिक व सामुहिक वन हक्क दावे निर्णित करण्यासाठी ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचे नियोजन करण्याबाबतचे वेळापत्रक निश्चित करावे. ग्रामसभेअभावी दावे प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. ग्रामस्तरीय समितीने आपल्या शिफारशीसह अंतिम केलेले दावे ग्रामसभेने ते पुढील कार्यवाहीसाठी उपविभागस्तरीय वन हक्क समितीकडे विनाविलंब पाठवावेत.

**३. उपविभागस्तरीय वन हक्क समितीची कार्यवाही**

१. ग्रामसभांकडून प्राप्त झालेले आणि अद्याप अंतिम निर्णयाच्या प्रतीक्षेत असलेले सर्व वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे प्राधान्याने हाताळावेत.

२. दाव्यांची अभिलेखीय तपासणी, आवश्यक सुनावणी / पडताळणी करून समितीचा निर्णय घ्यावा.

३. उपविभागस्तरीय समितीने पात्र / अपात्र म्हणून शिफारस केलेले दावे तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावेत.

४. त्रुटी असलेले दावे पूर्ततेसाठी ग्रामस्तरीय समितीकडे परत पाठवावेत; त्रुटी पूर्ततेसाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करून पाठपुरावा करुन घ्यावा.

**४. जिल्हास्तरीय वन हक्क समितीची कार्यवाही**

१. उपविभागस्तरीय समितीकडून प्राप्त झालेले व अंतिम निर्णयासाठी प्रलंबित असलेले सर्व दावे मोहिमेत समाविष्ट करावेत.

२. कायद्यानुसार दाव्यांची तपासणी करून, आवश्यक असल्यास संबंधित पक्षांना संधी देऊन, दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत अंतिम निर्णय घ्यावा.
३. पात्र दावे मंजूर करून त्यानंतरची अभिलेखीय कार्यवाही व वन हक्क प्रदान करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करावी.

**५. दावे गुणवत्तेवर निर्णयीत करणे –**

१. दावे गुणवत्तेवर निर्णयीत करण्यासाठी सर्व स्तरांवरील समित्यांनी MRSAC / Satellite Images चा वापर करावा.
२. त्याचबरोबर दाव्यातील क्षेत्राच्या वहिवाटीसंबंधी आवश्यक पुरावे (अधिनियम व नियमांनुसार ग्राह्य पुरावे) विचारात घ्यावेत. आवश्यक अभिलेख व पुरावे मिळविण्यासाठी सर्व संबंधित अधिका-यांनी दावेदारांना मदज करावी.
३. कोणताही पात्र दावा केवळ अभिलेखीय / तांत्रिक त्रुटीमुळे अनावश्यकपणे प्रलंबित राहणार नाही किंवा नामंजूर होणार नाही, याची दक्षता संबंधित समित्यांनी घ्यावी.

**६. नामंजूर वनहक्क दाव्यांचा आढावा**

१. यापूर्वी नामंजूर करण्यात आलेल्या वनहक्क दाव्यांची माहिती शासनास सादर करण्यात आली आहे.
२. नामंजूर दाव्यांबाबत दावेदारांना नामंजूरीची कारणे समजावून सांगून अतिरिक्त पुरावे व म्हणणे सादर करण्याची संधी त्यांना देण्यात यावी.
३. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर नामंजूर दाव्यांची पुन्हा एकदा तपासणी करून त्यांच्या पात्रतेबाबत उचित निर्णय घ्यावा. हे काम दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करावे.
४. या तपासणीतही MRSAC / Satellite Images व वहिवाटीसंबंधी आवश्यक पुरावे विचारात घ्यावेत आणि विहित प्रक्रियेनुसार दावेदारांना संधी द्यावी.

**७. मंजूर वन हक्कधारकांना ७ ई /१२ ई नमुन्यात वन हक्क अभिलेख / वनपट्टा प्रदान करणे**

१. यापूर्वीच्या व या मोहिमेदरम्यान मंजूर झालेल्या पात्र वन हक्कधारकांची स्वतंत्र यादी तयार करावी.
२. अशा मंजूर दावेदारांना शासनाने नव्याने निश्चित केलेल्या ७ ई / १२ ई नमुन्यात वन हक्क अभिलेख / वनपट्टा प्रदान करण्याची कार्यवाही मोहिमेच्या कालावधीत, म्हणजे दिनांक १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करावी.
३. संबंधित महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने मंजूर वन हक्कधारकांची नावे, मंजूर क्षेत्र, गट / सर्व्हे क्रमांक व इतर अभिलेखांची अचूकता तपासून ७ ई / १२ ई नमुना तयार करावा.
४. पात्र वन हक्कधारकांना सदर अभिलेख / वनपट्टा समारंभपूर्वक किंवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून द्यावा.

## ८. समन्वय व जबाबदारी

१. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील मोहिमेचे समन्वय व संनियंत्रण करावे.
२. उपविभागीय अधिकारी यांनी उपविभागस्तरीय कार्यवाहीचे समन्वय व नियमित आढावा घ्यावा.
३. संबंधित तहसीलदार, उप वन संरक्षक, प्रकल्प अधिकारी (आदिवासी विकास), ग्रामस्तरीय अधिकारी व इतर संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्याकडे सोपविलेली कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी.

## ९. विभागीय आयुक्तांचा आढावा व प्रगती अहवाल

१. विभागीय आयुक्तांनी वन हक्क दाव्यांबाबत दर १५ दिवसांनी आढावा घ्यावा आणि मोहिमेत एकही दावा प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.
२. प्रत्येक जिल्ह्याने मोहिमेची एकत्रित प्रगती सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** मध्ये संकलित करून, ती माहिती दर १५ दिवसांनी विभागीय आयुक्तांना सादर करावी.
३. मोहीम पूर्ण झाल्यानंतर अंतिम प्रगती अहवाल **प्रपत्र-अ** मध्ये शासनास तात्काळ सादर करावा.

## १०. मोहिमेचा उद्देश

सदर विशेष मोहिमेचा उद्देश कायद्यातील तरतुदी व विहित कार्यपद्धतीचे पूर्ण पालन करून पात्र वैयक्तिक व सामूहिक वन हक्क दाव्यांचा प्रलंबित अनुशेष कमी करणे, निर्णय प्रक्रियेस गती देणे आणि मंजूर वन हक्कधारकांना संबंधित अभिलेख ७ ई / १२ ई नमुना वेळेत उपलब्ध करून देणे हा आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी या मोहिमेस विशेष प्राधान्य देऊन निर्धारित कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६१०२७१३५३४७८३४८ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(विजय वाघमारे)**
**सचिव (आदिवासी विकास)**

**(चंद्रकांत पुलकुंडवार)**
**सचिव (ग्रामविकास)**

**(संजय खंदारे)**
**अपर मुख्य सचिव (वने)**

**(संतोष कुमार)**
**अपर मुख्य सचिव (महसूल)**

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक विभाग) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र, मुंबई.
८) विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भव मुंबई.
१०) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
११) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) अपर मुख्य सचिव (वने), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१४) सचिव (आदिवासी विकास विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१५) सचिव (ग्रामविकास विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सहसचिव/उपसचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवड नस्ती (कार्यासन जमीन-६), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

## प्रपत्र-अ

**अभियानाची एकत्रित प्रगती** (जिल्हा : __________ , विभाग : __________ , कालावधी : __________ ते __________)

| बाब | अभियानापूर्वीची संख्या | अभियानादरम्यान झालेली कार्यवाही | अंतिम स्थिती |
| --- | --- | --- | --- |
| प्राप्त वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे | | | |
| ग्रामस्तरीय वनहक्क समितीकडून तपासणी पूर्ण दावे | | | |
| ग्रामस्तरीय वनहक्क समितीने मंजूर केलेले दावे | | | |
| ग्रामसभेने उपविभागस्तरीय समितीकडे सादर केलेले दावे | | | |
| उपविभागस्तरीय समितीकडील प्रलंबित दावे | | | |
| उपविभागस्तरीय समितीने अंतिम निर्णय घेतलेले दावे | | | |
| जिल्हास्तरीय समितीकडील प्रलंबित दावे | | | |
| जिल्हास्तरीय समितीने अंतिम निर्णय घेतलेले दावे | | | |
| अंतिमतः मंजूर दावे | | | |
| त्रुटी पूर्ततेसाठी परत केलेले दावे | | | |
| नामंजूर दावे | | | |
| ७ ई / १२ ई प्रदान केलेले वनहक्कधारक | | | |
| अद्याप प्रलंबित दावे | | | |